MHAU070019912023

# <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

अर्जदारांनी सदरचा अर्ज भारतीय वारसा कायदा कलम ३७२ नुसार ते मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे वारस आहेत असा दाखला मिळावा याकरिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे नावे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा बजाजनगर, पंढरपूर, जि. औरंगाबाद येथे बचत खाते क्रमांक ३९०६९३६४७२ असा असून त्यामध्ये रक्कम रुपये १,३४,१३१/- (अक्षरी एक लाख चौतीस हजार एकशे एकतीस रुपये फक्त) शिल्लक आहे. मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांना अर्जदार हाच एकमेव कायदेशीर वारस असून त्या व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाही. मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे नावे असलेली रक्कम त्यांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदाराला मिळावी याकामी अर्जदाराला वारसाहक्क प्रमाणत्राची आवश्यकता आहे. याकरिता सदरील अर्ज दाखल केलेला आहे.

३. अर्जातील कथने अभिलेखावरील पुरावा, अर्जदाराच्या विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेता पुढील मुददे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. सदर मुददे निष्कार्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहे का ? | होय. |
| २. | आदेश काय ? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## पुरावा

४. अर्जदाराने अर्जासोबत निशाणी क्र.५ ला अर्जाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. निशाणी क्र. ४ सोबत मयत कुसूमबाई आनंदा सातपुते व मयत आनंदा नाथा सातपुते यांचे मृत्यू दाखल्याची प्रमाणित प्रती, बँक पासबुकाची प्रमाणित प्रत, बॅलन्स प्रमाणपत्राची प्रत व आधार कार्डची मुळ प्रत दाखल केली आहे. अर्जदाराने त्याचे सरतपासणीचे शपथपत्र नि.क्र. १० ला दाखल केलेले आहे. तसेच निशाणी क्र. ९ ला 'तरुण भारत' मध्ये दिनांक ०५.०८.२०२३ रोजी प्रसिध्द केलेली जाहीर नोटीस दाखल केलेली आहे. अर्जदाराने त्याचा पुरावा निशाणी क्र. ११ वर पुरसिस दाखल करुन बंद केलेला आहे.

## कारणमिमांसा

### मुददा क्र. १ करिता

६. मुददा क्र. १ च्या उत्तराचा मागोवा घेण्याकरिता मी अर्ज, अर्जासोबत दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अर्जदाराने मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे मृत्यू दाखला दाखल केलेला आहे. निशाणी क्र. ६ नुसार गंगापूर न्यायालयाच्या नोटीस बोर्डवर, तहसिल कार्यालय, मौजे देरडा गावचे ग्रामपंचायत कार्यालयास नोटीस डकविण्यात आली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच निशाणी क्र. ९ नुसार 'तरुण भारत' या वर्तमानपत्रात दिनांक ०५.०८.२०२३ रोजी जाहीर नोटीस प्रकाशित केलयाबाबतची वर्तमानपत्राची प्रत अभिलेखावर दाखल आहे. सदर अर्जास अर्जदाराने योग्य ती सायटेशन नोटीस व जाहीर नोटीस देऊनही कोणीही आजतागायत आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज आजपावेतो कोणीही आव्हानीत केलेला नाही. अर्जदाराने निशाणी क्र. १३ सोबत सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया शाखा औरंगाबाद या बँकेचे बॅलन्स प्रमाणपत्र दाखल केलेले आहे त्यामध्ये मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे नावे रक्कम रुपये १,३४,१३१/- (अक्षरी एक लाख चौतीस हजार एकशे एकतीस

रुपये फक्त) असल्याचे नमूद आहे. तसेच अर्जदाराने बँक खातेचे खाते पुस्तक दाखल केलेले आहे. म्हणून मी या मतांपर्यंत येऊन पोहचलो आहे की, अर्जातील कथने अर्जदाराने शाबीत केलेली आहेत. वरील सर्व विवेचनांवरुन अर्जदारांचा अर्ज नाकरावा असे कोणतेही कारण अभिलेखावर नाही. सबब मुददा क्र. १ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**मुददा क्र. २ बाबत.**

७. मुददा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविले आहे. या कारणास्तव अर्जदाराचा अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्याने तो मंजूर केला तर न्यायसंगत होणार आहे. सबब मी मुददा क्र. २ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार हे मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे नावे सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखा बजाजनगर, पंढरपूर, जि. औरंगाबाद येथे बचत खाते क्रमांक ३९०६९३६४७२ मध्ये शिल्लक रक्कम रुपये १,३४,१३१/- (अक्षरी एक लाख चौतीस हजार एकशे एकतीस रुपये फक्त) चे कायदेशीर वारस आहेत.

३. अर्जदार हे मयत कुसूमबाई आनंदा सातपुते यांचे नावे असलेल्या रक्कमेची वारस असल्याने त्यांना योग्य तो न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

४. प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by SATISH YASHWANT WAKCHAURE
Date: 2023.09.16 16:40:04 +0530

दिनांकः १६/०९/२०२३. ( एस.वाय. वाकचौरे )
३ रे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर, गंगापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Kailas Shivaji Rasve |
| Court | : | Shri. S.Y. Wakchaure,<br>3rd Joint Civil Judge (J.D) & J.M.F.C.Gangapur |
| Date of order | : | 16/09/2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 16/09/2023 |
| Order uploaded on | : | 16/09/2023 |